महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

क्रमांक : एस-३/मा.अ./जा.क्र.४२/२०२२/१८ दिनांक : १३ फेब्रुवारी, २०२४.

प्रति,

श्री.गणेश श्रीरंग सातारकर,
शिवनेरी, गट क्रमांक १५३, माने मळा,
तालुका- फलटण, जिल्हा सातारा-४१५ ५२३.
महाराष्ट्र.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम-२००५.
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी
प्रथम वर्ग मुख्य परीक्षा.

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या दि. ४ फेब्रुवारी,२०२४ रोजीच्या माहितीचा अधिकार अर्जासंदर्भात कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम २ (च) मध्ये विहित केलेल्या " माहिती " या व्याख्येनुसार " माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत अनुज्ञेय होते. खुलासा देणे, प्रश्नाला उत्तर देणे, चौकशी प्रक्रिया पूर्ण करून माहिती देणे, माहितीचे संस्करण करणे इत्यादीचा समावेश त्यामध्ये होत नाही." असे आदेश राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१४ रोजी दिले आहेत. यास्तव आपण मागितलेली माहिती आपणास पुरविता येणार नाही.

तसेच उमेदवारांच्या निवडीच्या अनुषंगाने आयोगाकडून करण्यात येणा-या गोपनीय स्वरुपाच्या कामकाजाबाबतची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ मधील कलम ८ (१)(घ)(ङ.) व (छ)अंतर्गत देता येत नाही.

२. सदर माहितीमुळे आपले समाधान झाले नसल्यास, आपण जनमाहिती अधिकाऱ्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात परीक्षा नियंत्रक व सहसचिव तथा अपिलीय प्राधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशूल सोनई कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर -११, सीबीडी बेलापूर- ४०० ६१४ यांचेकडे अपिल करु शकता.

आपली विश्वासू,

P Desai

(प्र. श. देसाई)
कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

Scanned with OKEN Scanner

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर

यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील क्रमांक : 523/2013

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर, प्रशासकिय
इमारत क्र.२, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.

श्री अरविंद नारायण कांबळे, : अपिलार्थी
फ्लॅट AII/०७ राय टाऊन, हिंगणा रोड, पो.एम.आय.डी.सी.
नागपूर - 440016

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - 400001 : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - 400001 :

1	अपील क्रमांक :	:	523/2013
2	सुनावणीची तारीख		दि. 04-02-2014
3	आज रोजीची उपस्थिती		
3.1	अपिलार्थी -	:	अनुपस्थित
3.2	जन माहिती अधिकारी तथा - अवर सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग श्री अ. ध. लोखंडे	:	उपस्थित
3.3	जन अपिलीय अधिकारी तथा - उप सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग यांच्या तर्फे प्रतिनिधी श्री अ. ध. लोखंडे	:	अनुपस्थित
4	जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख		दि. 17.03.2012
5	जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख		दि. 02.07.2012
6	प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख		दि. 14.07.2012
7	अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख		दि. 08.08.2012
8	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख		दि. 04.03.2013

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

2. आयोगापुढील कागदपत्रांवरून असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीत अर्जान्वये खालील मुद्यावर माहिती मागितली आहे.

"1) महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या जाहीरातीतील बॉयोमेकॉनिकल इंजिनियर खुल्या प्रवर्गाता अनुसुचीतील उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीस का बोलाविण्यात आले नाही त्याची कारणे व निकष देण्याबाबत

2) जाहीरातीं मध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व आरक्षणातील जातीच्या उमदेवाराने अर्ज देऊ नये असा स्पष्ट उल्लेख का करण्यात आला नाही हयाबाबत खुलासा करावा."

अशी माहिती मागितली आहे.

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

3. यातील मुद्दा क्र. 1 प्रश्नार्थक स्वरुपाचा आहे व मुद्दा क्र. 2 खुलासा मागणारा आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 2 (च) मध्ये माहितीची व्याख्या दिली आहे. त्यानुसार माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत अनुज्ञेय होते. खुलासा देणे, प्रश्नाला उत्तर देणे, चौकशी प्रक्रिया पूर्ण करुन माहिती देणे, माहितीचे संस्करण करणे इत्यादिचा समावेश त्यामध्ये होत नाही. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (1) नुसार विहित मुदतीत दि. 2 जुले 2012 रोजी प्रतिसाद दिलेला आहे. या बाबीची नोंद घेवून जन अपिलीय अधिकारी तथा - उप सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील दि. 8 ऑगस्ट 2012 रोजी फेटाळलेले आहे. प्रथम अपीलाच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते असे दिसून येते. या सर्व बाबी विचारात घेता अपिल निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(दी. बा. देशपांडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नागपूर

नागपूर
दिनांक 04-02-2014

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

प्रत,

1. श्री अरविंद नारायण कांबळे, फ्लॅट AII/०७ राय टाऊन, हिंगणा रोड, पो.एम.आय.डी.सी. नागपूर - 440016
2. जन माहिती अधिकारी तथा - अवर सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - 400001 यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
3. जन अपिलीय अधिकारी तथा - उप सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, तिसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - 400001 यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
4. निर्णय नस्ती.

Scanned with OKEN Scanner